## नि.क्र.०५ खालील आदेश

दावा निकाली लागेपर्यंत प्रतिवादींनी वाद जमीनतील वादीच्या ताब्यास व वाहीतीस अडथळा करु नये असा तात्पूरता मनाई हुकूम मिळविण्यासाठी वादीने हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ आणि कलम १५१ अन्वये दाखल केला आहे.

०२. वादीचे कथन असे की, मौजा तुपटाकळी, ता.दिग्रस, येथील शेत जमिन सर्व्हे क्रमांक ५२ नविन गट क्र.९८ मधील क्षेत्रफळ ३ एकर ३० गुंठे ही जमिन म्हणजेच **वाद जमिन** ही प्रतिवादीचे वडील मयत माणिकलाल हिरालाल बंग यांच्या मालकीची होती. सन १९४७ पुर्वी वाद जमिन माणिकलाल याने अनेक लोकांना वाहीतीकरीता दिली होती. तर वादीचे आजोबा विठ्ठलदास रामजिवन खडलोया यांना माणिकलालने वाद जमिन आपल्या मर्जीने व संमतीने दि.०१.०४.१९५१ पासुन लिजवर दिली व तेंव्हा पासुन विठ्ठलदास वहीती करु लागला. त्यामध्ये एक कच्ची विहीर होती. तिची दुरुस्ती व बांधकाम करुन सन १९५८ ते १९५९ मध्ये मयत विठ्ठलदासने स्वत:चे नावाने विज पुरवठा घेउन त्या विहरीवर मोटरपंप बसविले. विठ्ठलदास दिनांक २१.०७.१९८२ रोजी मयत झाले. त्यानंतर त्यांचा मुलगा मयत सिताराम वाद जमिन वहीती करु लागला. त्याने वाद जमिनीमध्ये एका पक्या खोलीचे बांधकाम केले व एक कोठा देखिल आहे. त्या खोलीमध्ये भिमराव झिंगराजी साबळे हा मागिल २० वर्षापासुन राहत असुन वाद जमिनीची तो रखवाली करीत आहे. सिताराम दि.२९.०८.२०१६ रोजी मयत झाला. म्हणुन त्यानंतर वारसा हक्काने वाद जमिन सर्व वारसाच्या वतीने वादी क्र.०२ श्रीधर वहिती करीत आहे.

०३ माणिकलाल बंग हे सन १९७५ मध्ये मयत झाले असावेत. प्रतिवादी क्र.०१ ते ०४ हे मयत माणिकलाल बंगचे वारस म्हणजेच मुलगा व मुली आहेत. माणिकलालच्या मृत्यूनंतर ते सन २०१८ र्प्यंत म्हणजेच ४३ वर्षा र्प्यंत माणिकलालचे नाव वाद जमिनीच्या रेकॉर्ड मध्ये मालक म्हणुन होते पण त्यानंतर

वारसा फेरफार होउन वाद जमिनीवर प्रतिवादींची नावे आली. पण प्रतिवादींनी वादींच्या ताब्यास कोणताही अडथळा केला नाही. म्हणुन वाद जमिनीवर वादीचा निरंतर व शांततामय ताबा आहे. दि.१५.०६.२०१८ रोजी दैनिक सकाळ या वर्तमान पत्रामध्ये शेख सलमान शेख रोशन याने वाद जमिनीबाबत खरेदी विक्रीबाबत बोलणी चालु असल्याचे जाहीर केले. सदर नोटीस बाबत वादींनी प्रतिवादी क्र.१ ला भेटुन विचारणा कली असता त्याने समाधान कारक उत्तर दिले नाही म्हणुन दि. १८.०६.२०१८ रोजी दैनिक देशोन्नतीमध्ये वादीने आपला खुलासा आम जनतेसाठी जाहीर केला. वाद जमिनीमध्ये सध्याला ज्वारीचे पिक आहे व त्यानंतर वादी गव्हाची पेरणी करणार आहे पण प्रतिवादी ती जमिन विकण्यासाठी दलालांना पाठवत आहे व ग्राहकांना जमिन दाखवत आहे. त्यामुळे वाद जमिनीतुन आपल्याला प्रतिवादी कधीही बेदखल करु शकतात अशी भिती निर्माण झाल्यामुळे वादींनी हा दावा दाखल केला आहे व मागणीप्रमाणे अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

०४ प्रकरण नि.क्र.०५ वर आदेशासाठी प्रलंबीत असतांना वादींनी दाव्यात दुरुस्ती केली. त्यामुळे त्यांचे असेही कथन आहे की वाद जमिनीच्या संदर्भाने मयत माणिकाल आणी मयत विठ्ठलदास यांच्यामध्ये तहसिलदार दारव्हा यांच्यासमोर रा.मा.क्रमांक ३२/५९/(१३)/१९६३-६४ मौजा तुपटाकळी हे प्रकरण सुरु होते. त्यामध्ये मयत विठ्ठलदासला कुळ घोषीत करण्यात आले होते. यामध्ये दोघांनी वरिष्ठ महसुल न्यायालयात अपिल केली.

०५ त्याबरोबरच वाद जमिन फळबाग करीता भाडयाने दिलेली असुन ती कोरडवाहु जमिनीच्या वहती करीता नाही अशी घोषणा करावी म्हणुन मयत माणिकलालने मयत विठ्ठलदासच्या विरोधात दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र.१०९/१९७३ दाखल केला होता तो न्यायालयाने दिनांक २३.०४.१९८१ रोजी मजूर केला. त्या विरोधात मयत विठ्ठलदासने दाखल केलेली सिव्हील अपिल क्रमांक १६०/१९८१ ही दिनांक ०४.०१. १९८४ रोजी खारीज झाली. त्याविरोधात मयत विठ्ठलदासने मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर, येथे दाखल केलेली दुसरी दिवाणी अपिल क्र.२२६/१९८४ सुध्दा

दिनांक २३.०९.१९८५ रोजीच्या आदेशान्वये खारीज झाली.

०६ प्रतिवादी क्र.१ प्रकरणात हजर झाले व त्यांनी आपली लेखी कैफियत नि.क्र.८० दाखल केली. तसेच या अर्जाला उत्तर म्हणुन नि.क्र.१११ दाखल केले. वाद जमिन मयत माणिकलालच्या मालकीची होती व दाव्यामध्ये वर्णन केल्याप्रमाणे आहे. या जमिनीमध्ये विहीर आहे. त्या विहीरीवर विठ्ठलदास यांनी वीज पुरवठा घेउन मोटर पंप बसिले होते. वाद जमिनीमध्ये गोठा आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ हे मयत माणिकलालचे वारस आहेत. वाद जमिनीबाबत फेरफार घेत असतांना वादीने आक्षेप घेतला होता पण तो खारीज झाला ही बाब त्यांनी मान्य केली. पण दाव्यातील इतर कथन त्याने नाकारले. त्याचबरोबर परिच्छेद क्र.७ मध्ये वाद जमिन वादीच्या वहीतीमध्ये असलयाचे व तो वहिती करत असल्याची त्यांनी नाकारले.

०७ त्याचे पुढे असे कथन आहे की शेत जमिन न्यायाधिकरण किंवा तहसिलदार दारव्हा यांच्या समोरील महसुल प्रकरण रा.मा.क्रमांक ३२/५९/(१३)/१९६३-६४ मौजा तुपटाकळी यामध्ये निकाल मयत विठ्ठलदासच्या बाजुने लागला म्हणुन त्या आदेशाविरुध्द मयत माणिकलालने वरिष्ठ न्यायालयाकडे अपिल क्र.०१/५९/(१३)/१९६४-६५ केली व ती दिनांक २९.०४.१९६५ रोजी खारीज झाली. त्यानंतर शेवटी महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, नागपूर, यांचे कडे मयत माणीकलालने केस क्रमांक १०/२०१७ दाखल केले व त्यामध्ये दिनांक १९. १०.१९६६ रोजीच्या आदेशान्वये न्यायालयाचा आदेश रद्य करण्यात आला व ते प्रकरण तहसिलदार यांच्याकडे नव्याने चौकशी करीता परत पाठविले. त्यानंतर तहसिलदार दारव्हा यांनी दि.१५.०७.१९६८ रोजी आदेश केला व वाद जमीनीची किंमत रु.७०७/ ठरविली. त्यावर मयत माणीकलालने अपिल क्र. ७०/५९/(१३)/१९६८-६९ तुपटाकळी केली व ती दिनांक २७.०२.१९६९ रोजी खारीज झाली. त्यानंतर शेवटी महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, नागपूर, यांचे मयत माणीकलालने अपिल क्र. ६०१/६९ दाखल केली व त्यामध्ये दिनांक २२.

०९.१९७० रोजीच्या आदेशान्वये न्यायालयाचा आदेश रद्द करण्यात आला व ते प्रकरण तहसिलदार यांच्याकडे नव्याने चौकशी करीता परत पाठविले. त्यानंतर तहसिलदार यांनी बागायती की कोरडवाहु कुळ ठरविण्याचा अधिकार आपल्याला नसल्याचे सांगुन पक्षकारांना दिवाणी न्यायालयात जाण्यास सांगितले. या आदेशाविरुध्द मयत विठ्ठलदासने उपविभागीय अधिकारी दारव्हा यांच्या समक्ष अपिल क्र.५२/५९(१३)/७१-७२ तुपटाकळी हे प्रकरण दाखल केले व ती अपिल दिनांक १२.०७.१९९२ रोजी खारीज झाली. त्यानंतर माणीकलालने दिवाणी दावा क्र. १०९/१९७३ जो दाखल केला तो मंजूर झाला व त्यामध्ये मयत विठ्ठलदासच्या बागायाती वहितीसाठी जमीन होती असे जाहीर केले होते. त्यानंतर मयत विठ्ठलदासने वरीष्ठ न्यायालतयात अपिल क्र.१६०/१९८१ दाखल केली जी दि.०४. ०१.१९८४ रोजी खारीज झाली. त्यानंतर मयत विठ्ठलदासने मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे दुसरी अपिल क्र.२२६/१९८४ दाखल केली जी खारीज झाली.

०८ अशाप्रकारे वादी किंवा वादीचे पुर्वज हे वाद जमीनीचे कुळ नव्हते व नाहीत आणी त्यांना वारसाने हक्क पोहचत नाही. वाद जमीनीचे मालक मयत माणीकलाल होते व सध्याला प्रतिवादी आहेत. हा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचे नुकसान होईल. वादीने खोटा दावा दाखल केला म्हणुन हा अर्ज नामंजूर करावा अशी या प्रतिवादीने विंनती केली. दोन्ही बाजुंचा तोंडी युक्तिवाद ऐकला. तसेच वादी तर्फे दाखल करण्यात आलेल्या लेखी युक्तिवाद नि.क्र.८६ चे बारकाईने अवलोकन केले.

०९. पुढील मुद्दे मी विचारार्थ घेतले व त्यावरील निष्कर्षाची कारणेमिमांसा मी खालीलप्रमाणे केली आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १- | वादीचा सकृतदर्शनी दावा आहे काय? | होय |
| २- | अनुकुलतेचा कल वादीच्या बाजूने आहे काय? | होय |
| ३- | मनाई हुकुम न दिल्यास वादीचे न भरून येणारे नुकसान होईल काय? | होय |
| ४- | आदेश काय ? | अंशत: मंजुर |

## कारणेमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत:-**

१० आपल्या दाव्यातील व प्रस्तूत अर्जातील कथनाच्या पृष्ठार्थ वादीने दस्तऐवजांची यादी नि.क्र.०३ व ९९ वर दस्ताऐवज दाखल केले. तर प्रतिवादी क्र. १ तर्फे यादी नि.क्र. ९३ आणी ९६ वर कागदपत्र दाखल केले. वाद जमिन मयत माणिकलाल बंगची आहे म्हणजेच प्रतिवादी क्र.०१ ते ०४ च्या वडीलांच्या मालकीची आहे ही बाब वादातील नाही.

११. वादींनी दावा नि.क्र.०१ हा कायमच्या मनाई हुकूमाबाबत दाखल केलेला आहे व वाद जमिनीतील आपल्या ताब्यास प्रतिवादींनी अडथळा करु नये असा कायमचा मानाई हुकूम मिळावा अशी विनंती केली. तसेच हा अर्ज सुध्दा वादींनी त्याच मागणीसाठी तात्पुरता मनाई हुकूम मिळावा म्हणुन दाखल केला. या अर्जामध्ये वादींची अशीही मागणी आहे की दाव्याचा निकाल लागेपर्यंत वाद जमिनीच्या हस्तांतरनाबाबतचे कोणतेही दस्त प्रतिवादींनी नोंदवु नये असाही मनाई हुकूम मिळावा. वादातील मालमत्ता ही शेत जमिन म्हणजेच वाद जमीन आहे ही बाब लक्षात घेता हा अर्ज निकाली काढत असतांना या वाद जमीनीवर ताबा कोणाचा आहे ही बाब पाहणे गरजेचे आहे व ती बाब महत्वाची ठरते. त्याबरोबरच वादीने कथन केल्याप्रमाणे वाद जमिनीवर आपला ताबा आहे ही बाब प्रथमदर्शनी दाखवुन देण्याची जबाबदारी वादीची आहे. कारण वादीचे असे म्हणणे आहे की त्यांचे आजोबा मयत विठ्ठलदास यांनी प्रतिवादीचे वडील मयत माणिकलाल यांच्या कडुन वाद जमिन मक्त्याने वहितीकरीता दि.०१.०४.१९५१ रोजी घेतली होती किंवा लिजवर घेतली होती व मयत विठ्ठलदासने ती जमीन वहिती केली व त्यानंतर त्यांचा मुलगा मयत सिताराम म्हणजेच वादीच्या वडीलांनी वहिती केली व आता वादी श्रीधर शांततापूर्वक वहिती करीत आहे. मयत विठ्ठलदासने वाद जमिनीची वहिती केली व त्यानंतर त्याचा मुलगा मयत सिताराम व आता वादी वहीती करीत आहे ही बाब प्रतिवादी क्र.०१ ने आपल्या लेखी जबाब नि.क्र.८० मधील परिच्छेद क्र.०३ व ०७ मध्ये स्पष्टपणे नाकारली आहे.

१२ वाद जमिनीवर वादीचा ताबा आहे किंवा नाही ही बाब पडताळण्यासाठी मी वादी तर्फे दाखल करण्यात आलेले कागदपत्रे पाहीले. वादी तर्फ पटलावर दस्तएवजाची यादी नि.क्र.०३ वर एकुण ३० कागदपत्रे दाखल करण्यात आले. यामधील दस्तएवज क्र.०२ ते १९ हया पेरेपत्रकाच्या प्रती आहेत. यामधील दस्तएवज क्र.०२ ते ०९ आणी १२ ते १४ या पेरेपत्रकावरुन असे दिसते की सन १९५७-५८ ते १९६४-६५ आणी सन १९६७-६८ ते १९७१-७२ या दरम्यान मयत विठ्ठलदासने वाद जमीन दरवर्षी मक्त्याने केली होती. तसेच यातीलच दस्तएवज क्र.१० आणी ११ या पेरेपत्रकावरुन असे दिसते की सन १९६५-६६ आणी सन १९६७-६८ या दरम्यान मयत विठ्ठलदासचे नाव संरक्षीत पट्टेदार म्हणुन होते. तसेच यातीलच दस्तएवज क्र.१५ ते १८ या पेरेपत्रकावरुन असे दिसते की सन १९७३-७४ ते १९७६-७७ या दरम्यान मयत विठ्ठलदासचे नाव संरक्षीत पट्टेदार म्हणुन होते व सरकारी सा-याने त्याने वाद जमिन वाहीली होती. तर यातीलच दस्तएवज क्र.१९ सात बारा उतारा यावरुन असे दिसते की सन १९८० ते १९८१ या दरम्यान वाद जमीन मयत विठ्ठलदासने वाहीली. तसेच यातीलच दस्तएवज क्र.२१ व २२ म्हणजेच सात बारा उतारा यावरुन असे दिसते की सन १९९४-९५ ते २०१०-११ या दरम्यान वाद जमीन मयत विठ्ठलदासचा मुलगा मयत सिताराम हा वाहत होता. म्हणजेच सन १९५७-५८ ते २०१०-११ या दरम्यान वाद जमीन विठ्ठलदास व त्याच्या कुटूंबीयाच्या वहितीमध्ये होती ही बाब प्रथमदर्शनी दिसुन येते. याबद्दल जरी प्रतिवादी क्र.०१ च्या वतीने नाकारले गेले असले तरी तसे घडले नाही हे दाखविण्यासाठी प्रतिवादी तर्फे याक्षणी कोणताही कागदोपत्री पुरावा पटलावर दाखल करण्यात आला नाही. प्रतिवादी क्र.१ च्या वकीलांनी आपल्या युक्तिवादात नमूद केले की शेत सारा मिळविण्यासाठी महसुलच्या नोंदी असतात व त्या कोणाचाही हक्क सिध्द करु शकत नाही. यासाठी त्यांनी पटलावर **आबासाहेब बली घारगे** ***विरुध्द बालाजी रामहरी घारगे १९९६ (1) एम.एच.एल.जे.२०९*** या प्रकरणातील मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या न्यायतत्व दाखल केले. पण माझ्या मते हातातील प्रकरणात हे लागु पडत नाही

कारण त्या प्रकरणात मालकी दाखविण्यासाठी कागदपत्राचा वापर होत होता तर हातामधील प्रकरणात ताबा दर्शवीण्यासाठी दाखल केलेले आहे.

१३ वाद जमिन सध्याला आपल्या ताब्यात आहे असे वादी म्हणतात तर प्रतिवादी क्र.०१ त्यांची वहिती नाकारतो. पण वाद जमिन सध्याला आपल्या ताब्यात आहे, आपण किंवा आपल्या वतीने इतर कोणीही ती वाहते, वाद जमिनीत आपण कोणते पिक पेरले याबद्दल प्रतिवादी तर्फे कोणताही कागदोपत्री पुरावा याक्षणी पटलावर आला नाही. याउलट अर्ज नि.क्र.०५ च्या अनुषंगाने किंवा वाद जमिनीवर ताबा आहे हे दाखविण्यासाठी वादी तर्फे पटलावर तुकाराम रामजी घ ानाटे, आनंता विष्णु ठाकरे, भिमराव झिंगराजी साबळे, श्रीमती जमना राहु चव्हाण यांची शपथपत्र दाखल केली आहे. तर यादी नि.क्र.४५ वर संतोष नारायण निकम आणी ओंकार नंदकिशोर खडलोया यांचे शपथपत्र दाखल केले. या सहाही जणांचे असे कथन आहे की वाद जमिनीवर सध्याला वादींचा ताबा आहे व त्यात त्यांनी ज्वारीचे पिक पेरलेले आहे. मान्यत: प्रतिवादी तर्फे कोणत्याही व्यक्तिचे शपथपत्र दाखल करण्यात आले नाही. म्हणुन याक्षणी वाद जमिनीवर वादींचा ताबा आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१४ वादींनी दाखल केलेले कागदपत्रे लक्षात घेता ब-याच वर्षापासुन वाद जमिनीवर वादींचा ताबा आहे ही बाब प्रथमदर्शनी दिसते. महत्वाची बाब म्हणजे सुरुवातीच्या काही वर्षात मयत विठ्ठलदासने वाद जमीन वर्षाने मक्त्यावर केल्याचे व त्यानंतर संरक्षीत पट्टेदार म्हणुन सरकारी सा-यावर जमिन कसल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. पण प्रतिवादी तर्फे लेखी कैफियतीमध्ये असे कुठेही नमूद करण्यात आले नाही की मयत विठ्ठलदास कडुन किंवा त्यांचे वारसाकडुन मयत माणीकलालने किंवा प्रतिवादींनी वाद जमिनीचा ताबा परत घेतला होता व वाद जमिन त्यांच्या ताब्यात आहे.

१५ वादी तर्फे व प्रतिवादी तर्फे पटलावर शेत जमिन न्यायाधीकरण किंवा तहसिलदार यांच्या समोर मयत विठ्ठलदास व मयत माणीकलाल यांच्यात वाद जमिनी संदर्भात प्रकरण दाखल झाले होते व त्यामध्ये आदेश झााला आणी त्यानंतर

आपिल झाली व पुढे मा. महाराष्ट् महसुल न्यायाधीकरण, नागपूर, यांच्या समक्ष अपिल झाली व त्यामध्ये निकाल झाला, त्यानंतर दिवाणी न्यायालयात दावा क्र. १०९/१९७३ दाखल झाला व त्यामध्ये निकाल झाला याबाबी पटलावर आणल्या गेल्या. म्हणजेच वाद जमीनी संदर्भात महसुल मध्ये व दिवाणी न्यायालयात या अगोदर प्रकरणे झालीत ही बाब प्रथमदर्शनी दिसते. तर दोन्ही बाजुने कथन केलेल्या त्या दिवाणी दाव्यातील निकालाप्रमाणे मयत विठ्ठलदासच्या ताब्यात वाद जमिन फळबागे करीता भाडयाने दिली होती अशी घोषना केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. म्हणजेच यावरुनही असे म्हणता येते की वाद जमिन मयत विठ्ठलदासच्या ताब्यात भाडयाने होती व तो ती वाहत होता. दुसरी बाब अशी की त्याच्या कडे ती भाडयाने किंवा लिजवर असतांना मयत माणिकलालने किंवा प्रतिवादींनी त्याचा ताबा काढुन घेण्यासाठी कोणती नोटीस दिली काय व तसा काही प्रयत्न केला काय असे मालमत्ता हस्तांतर अधिनियमाचे कलम १०६ किंवा १११ अन्वये प्रथमदर्शनी दिसुन येत नाही.

१६ कारण सदर कलमान्वये मयत माणिकलालने किंवा त्याच्या वारसांनी किंवा प्रतिवादींनी मयत विठ्ठलदासला किंवा त्याच्या वारसांना किंवा वादींना तशी नोटीस दिल्याचे व त्यानंतर वाद जमिनीचा ताबा परत घेतल्याचे प्रतिवादीचे कुठेही म्हणणे नाही व तसे कागदपत्र पटलावर नाहीत. त्याबरोबरच तसा नियमाप्रमाणे ताबा परत घेण्यासाठी दावा दाखल केला होता काय याबद्दलही प्रतिवादीचे म्हणणे नाही. तसेच या दाव्यातही प्रतिवादी तर्फे ताबा परत मिळावा म्हणुन प्रतिदावा दाखल केला नाही. त्यामुळे याक्षणी तरी असे म्हणता येईल की वादींचा ताबा हा बेकायदेशिर नाही. त्याबरोबरच प्रस्थापीत न्यायतत्तवानुसार असे म्हाण्ता येते की ताबा हा बेकायदेशिर असला तरी मुळ मालकाला तो ताबा कायदेशिर मार्गाने परत घेईपर्यंत त्या ताब्याबाबत तात्पुरता मनाई हुकूम देता येतो. म्हणुन प्रतिवादी तर्फे पटलावर दाखल करण्यात आलेल्या ***गणेश डी. दैवजना विरुध्द प्रकाश एस. सालकर २००० (३) एम.एच.एल.जे. ३४७*** या प्रकरणातील मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या न्यायतत्व हातातील प्रकरणात

लागु पडत नाही कारण त्या प्रकरणातील परिस्थिती व हातातील प्रकरणातील परिस्थिती वेगवेगळी आहे. कारण हातातील प्रकरणात वादींचा वाद जमिनीवरील ताबा बेकायदेशिर आहे असे प्रथमदर्शनी दिसत नाही.

१७ याचे दुसरे कारण असे की, वादी तर्फे पटलावर दाखल करण्यात आलेल्या दस्तऐवजांची यादी नि.क्र.९९ वरील कागदपत्रावरुन असे दिसते की वाद जमिन मयत विठ्ठलदासला वाहीतीसाठी नेमकी कोणत्या प्रकारे दिली होती व तो कुळ होउ शकतो काय याबाबत शेत जमिन न्यायाधीकरण दारव्हा, तहसिलदार, एस.डी.ओ. दारव्हा आणी मा.महाराष्ट् शेत जमिन न्यायाधीकरण, नागपूर, यांच्यासमोर वाद जमिनी विषयी प्रकरणे चालली होती व शेवटी प्रकरण उपविभागीय अधिकारी दारव्हा यांच्या समोर टेनेन्सी अपिल क्र.५२/५९ (१३) ७१-७२ तुपटाकळी असताना त्या न्यायाधीकरणाने दि.१२.०७.१९७२ रोजी आदेश केला की वाद जमिन कोरडवाहुसाठी दिली होती की बागायतीसाठी दिली होती हे ठरविण्याचा अधिकार हा दिवाणी न्यायालयाचा आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.०१ ने दाखल केलेल्या दस्तएवजाची यादी नि.क्र.९६ वरील कागदपत्रावरुन असे दिसते की दिवाणी दावा क्र.१०९/१९७३ मधील दिवाणी न्यायालयाचा दि.२३.०४.१९८१ रोजीचा आदेश असे दर्शवीतो की मयत विठ्ठलदासला वाद जमीन ही बागायती वहितीसाठी देण्यात आली होती असे घोषीत करण्यात आले. तसेच असेही दिसते की त्यानंतर पहिली अपिल क्र.१६०/८१ आणी दुसरी अपिल क्र.२८६/८४ मधील आदेशान्वये दिवाणी दावा क्र.१०९/१९७३ मधील आदेश कन्फर्म झाला. म्हणजेच या सर्व प्रकरणावरुन याक्षणी तरी असे दिसते की वाद जमिन ही बागायती वहितीसाठी मयत विठ्ठलदासच्या ताब्यात होती व त्यानंतर सध्याला वादीच्या ताब्यात आहे. म्हणुन याक्षणी तरी असे म्हणता येते की वादीचा वादजमिनीवरील ताबा हा हक्कदार ताबा या स्वरुपात येते. म्हणुन वादी तर्फे पटलावर दाखल करण्यात आलेल्या ***<u>भगवानराव जिजबा अवटी विरुध्द गणपतराव मुगणी राउत व इतर १९८७ (३) बॉम्बेसी.आर.२५८</u>*** आणी **<u>बळीराम मारोती सातवेकर</u>**

***विरुध्द दादु गोविंद तिपुगडे व इतर, मनु/एच/०५३२/१९८३*** या दोन्ही प्रकरणातील मा. उच्च न्यायालयाने नमूद केलेल्या न्यायतत्व हातातील प्रकरणात लागु पडते. कारण हातातील प्रकरणात मनाई हुकूमाचा दावा आहे व कुळा संबंधीचा मुद्या अगोदरच निकाली निघालेला आहे व वादींचा वाद जमीनीवर ताबा आहे ही बाब प्रथमदर्शनी दिसत आहे.

१८ मान्यत: वादी हे वाद जमिनीचे कुळ होतात किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयाचा नाही. तसेच मुंबई कुळ कायदा, (विदर्भाकरीता,) च्या कलम ५८ अन्वये असेही प्रथमदर्शनी दिसते की बागायती जमिनीच्या वहितीत असलेल्या जमिनी त्यामध्ये येत नाहीत किंवा त्यासाठी तो कायदा लागु होत नाही. म्हणुन याक्षणी वादी हे वाद जमिनीचे कुळ आहेत काय किंवा होतात असे प्रथमदर्शनी दिसत नाही पण वाद जमिनीवर त्यांचा ताबा आहे एवढेच म्हणता येते. म्हणुन प्रतिवादी तर्फे पटलावर दाखल करण्यात आलेल्या ***श्रीराम मंदीर संस्थान विरुध्द वत्सलाबाई व इतर २००० (१) एम.एच.एल.जे.३२१*** या प्रकरणातील मा.सर्वेच्च न्यायालयाने नमूद केलेल्या न्यायतत्व हातातील प्रकरणात लागु पडत नाही कारण त्या प्रकरणातील परिस्थिती व हातातील प्रकरणातील परिस्थिती वेगवेगळी आहे. कारण हातातील प्रकरणात वादींचा वाद जमिनीवरील ताबा शांततामय रित्या असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे याक्षणी तरी ती बाब गृहीत धरता येणार नाही व साक्षपुराव्यानंतर वाद जमिनीवरील ताबा कुळाचा वारस म्हणुन आहे की सेटल पझेशन म्हणुन आहे ही बाब समोर येईल.

१९ वाद जमिनीवर वादीचा ताबा आहे किंवा ते वहिती करतात ही बाब लक्षात घेता वादीच्या ताब्यास याक्षणी सरंक्षण देणे गरजेचे आहे असे मला वाटते. कारण प्रतिवादी क्र.१ ते ४ हे मालक म्हणुन वाद जमिन कायदेशीर रित्या परत मागु शकतात पण त्यांना गैरकायदेशिर रित्या वादीच्या ताब्यास अडथळा करण्याचा अधिकार पोहचत नाही. म्हणुन वादींची प्रथमदर्शनी केस आहे व

वादीच्या ताब्यास तात्पुरत्या मनाई हुकूमाने संरक्षण न दिल्यास त्यांचे न भरुन येणारे नुकसान होईल असे म्हटल्यास न्यायाची बाजु सांभाळली जाउ शकते.

२० प्रतिवादी क्र.०१ च्या वकीलांनी आपल्या युक्तिवादात नमूद केले की वादी हे वाद जमिनीचे भाडेकरु किंवा कुळ आहेत किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार सदर अधिनियमाच्या कलम १२४ अन्वये दिवाणी न्यायालयास नाही व तसा मुद्या तहसिलदाराकडे किंवा शेतजमिन न्यायाधीकरणाकडे प्रलंबीत असल्यास कलम १२५ प्रमाणे दिवाणी न्यायालयाला आपल्या समोरील दिवाणी दावा स्थगीत करावा लागतो. या अनुषंगाने त्यांनी पुढे असे नमूद केले की महणुन हा दावा स्थगीत करावा लागेल कारण वादींनी तहसिलदार दिग्रस येथे तसा अर्ज केलेला आहे. या अनुषंगाने वादी तर्फे पटलावर दाखल करण्यात आलेल्या दस्तएवजांची यादी नि.क्र.९९ वरील दस्त क्र.०१ हा सदरच्या अर्जाची प्रत आहे. या प्रतिवरुन असे दिसते की वादींनी प्रतिवादी विरुध्द वाद जमिनीविषयी तहसिलदार दिग्रस यांच्या समोर शेत जमिन न्यायाधीकरणच्या दि.१२.१२.१९६४ च्या आदेशाप्रमाणे (प्रकरण क्र.३२/५९ (१३)/६३-६४ तुपटाकळी) किंमत निश्चित करुन कार्यपुर्ती म्हणुन खरेदीखत नोंदवुन देण्याच्या कार्यवाहीबाबत दाखल केलेला आहे. माझ्या मते प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद याक्षणी तरी गृहीत धरता येणार नाही. कारण तो अर्ज कार्यपुर्ती करता आहे व हा दावा मनाई हुकूमाचा आहे ही बाब लक्षात घेता दिवाणी न्यायालयाचा मनाई हुकूमाचा आदेश करण्याच्या अधिकारास बाधा येत नाही. त्याबरोबरच कुळा विषयीचा मुद्या अगोदरच दिवाणी दावा क्र.१०९/१९७३ मध्ये अगोदरच निकाली निघाला हे पटलावरुन दिसुन येते व तो मुद्या त्या न्यायाधीकरणा पुढे युक्तिवादाचा आहे. त्यामुळे पुन्हा हा दावा स्थगीत करण्याची गरज याक्षणी दिसत नाही व तो साक्षपुराव्याचा भाग आहे व वेगळा युक्तिवादाचा भाग आहे.

२१ या अर्जामध्ये वादींच्या दोन मागण्या आहेत व त्या म्हणजे आपल्या ताब्यास प्रतिवादींनी अडथळा करु नये व वाद जमिनीविषयी प्रतिवादींना

हस्तांतरणाबाबत कोणतेही दस्तएवज नोंदवु नयेत. माझ्या मते वादीची दुसरी मागणी मंजूर करता येत नाही कारण प्रतिवादी हे वाद जमीनीचे मालक आहेत व त्याबाबत काय करायचे हा अधिकार प्रतिवादींचा आहे. म्हणजेच वादींना आपल्या ताब्यास केवळ प्रतिवादींनी अडथळा करु नये अशीच मागणी मंजूर करता येईल व त्याच्या ताब्यास संरक्षण मिळाले की आपोआपच त्याचे न भरुण येणारे नुकसान होणार नाही म्हणुन हा अर्ज अंशत: मंजुर करावा लागेल. येणेप्रमाणे मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी काढला आहे. येणे प्रमाणे मुद्दा क्र.०४ चा निष्कर्ष म्हणून मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१. वादीचा अर्ज नि.क्र.०५ अंशत: मंजुर करण्यात आला.

२. दाव्याचा निकाल लागे पर्यंत वाद जमिनीतील वादींच्या ताब्यास प्रतिवाद क्र. ०१ ते ०४ यांनी स्वत: किंवा इतरा मार्फत अडीअथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम प्रतिवादी क्र.१ ते ४ च्या विरुध्द देण्यात येतो.

३. खर्चाबद्दल आदेश नाही.

दि. १२.०३.२०१९

**(सतीश या. कदम)**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
**दिग्रस**